नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०७/२०२६ (मंगळवार)

---

## पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत खुनाचा प्रयत्न करणाऱ्या ६ पाहीजे आरोपींना १२ तासाच्या आत अटक स्थानिक गुन्हे शाखा , नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक २८/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत झालेल्या खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या सहा आरोपींना तांत्रिक पुरावे व गोपनीय माहितीच्या आधारे सौसर ते रामाकोना मार्गावरून ताब्यात घेवुन अटक केली आहे.**

दिनांक २७/०७/२०२६ रोजी सायंकाळी ०६.३० वाजता सुरज निवटे हा त्याच्या मित्रांसह उमरेड परिसरातील बेसूर येथील शिवरामराठा गॅरेजजवळ असताना **१.सौरभ अमन गजभिये, वय २७ वर्षे ,२.बद्री उर्फ सुनिल दत्तु नारनवरे, वय ६० वर्षे, ३.नागेश सुनिल नारनवरे, वय २२ वर्षे, ४. सागर सुधाकर नारनवरे, वय ३१ वर्षे, ५. हर्षल सुधाकर हिवाळे, वय ३० वर्षे, सर्व रा. राहुल नगर, झोपडपट्टी, सोमलवाडा. आणि आरोपी क्र ६. पवन उर्फ टोबो राजु शिवनकर, वय २० वर्षे, रा. बेसुर, ता. भिवापूर** या आरोपींनी त्याच्याशी दिनांक २६/०७/२०२६ रोजी झालेल्या पूर्वीच्या वादाच्या कारणावरून सुरज निवटे याला मारहाण करून गंभीर दुखापत करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सदर जखमीला उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १०९(१),३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**सदर घटनेनंतर आरोपी पळुन गेल्याने ते मिळुन येत नव्हते. त्यांचा शोध घेण्यासाठी उमरेड पोलीसांसह स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने आरोपींचा शोध सुरू केला असता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशनच्या मदतीने तांत्रिक पुराव्यांचे विश्लेषण तसेच गोपनीय माहितीच्या आधारे सपळा रचुन वर नमुद सहा आरोपी यांना दिनांक २८/०७/२०२६ रोजी मध्यप्रदेश राज्यातुन सौसर ते रामाकोना मार्गावरून ताब्यात घेण्यात आले असून आरोपींना अटकेची प्रक्रिया सुरू आहे. आरोपी बद्री उर्फ सुनिल दत्तु नारनवरे आणि सागर सुधाकर नारनवरे हे नागपुर शहर येथील अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असुन त्यांचे वर अनेक गंभीर गुन्हयांची नोंद आहे. सागर सुधाकर नारनवरे याला नागपुर शहर येथुन हद्दपार करण्यात आले आहे.**

## मध्यप्रदेशातील संगणमताने खुनाचा प्रयत्नाच्या गुन्हयातील दोन पाहिजे आरोपींना अटक ;स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक २८/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मध्यप्रदेशातील संगणमताने खुनाचा प्रयत्नाच्या गुन्ह्यातील दोन निष्पन्न आणि पाहिजे आरोपींना कन्हान, परिसरातून ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी मध्यप्रदेश पोलिसांच्या ताब्यात दिले. सदर दोन्ही आरोपींवर पोलीस अधीक्षक, जिल्हा जबलपूर, मध्यप्रदेश यांनी नगद पुरस्काराची उद्घोषणा करण्यात आलेले फरार आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.**

पोलीस स्टेशन घमापूर, जिल्हा जबलपूर, मध्यप्रदेश येथे अप. क्र. ४२४/२०२६, कलम १०९(१), ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हा घडल्यापासून दोन्ही आरोपी पोलीसांना मिळुन येत नव्हते. सदर आरोपी कन्हान पोलीस ठाणे परिसरात फिरत असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास प्राप्त झाली .मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचुन आरोपींचा शोध घेऊन दोन्ही निष्पन्न आरोपी **क्र १) विपेन्द्र उर्फ डॉक्टर उर्फ सम्राट मेवालाल चौधरी, वय २५ वर्षे, रा. काचघर, झेंडा चौक, धमापूर, जबलपूर, मध्यप्रदेश. आणि २) तनिष आशिष जायसवाल,**

**वय २३ वर्षे, रा. काचघर, धमापूर, जबलपूर, मध्यप्रदेश** यांना कन्हान परीसरातुन ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्ह्यातील सहभागाबाबत कबुली दिली. त्यानंतर पोलीस स्टेशन घमापूर, जिल्हा जबलपूर, मध्यप्रदेश येथील पोलिसांना आरोपींबाबत माहिती देवुन पुढील तपास व कायदेशीर कारवाईसाठी दोन्ही आरोपींना पोलीस स्टेशन धमापूर, जिल्हा जबलपूर, मध्यप्रदेश येथील पोलीस पथकाच्या ताब्यात देण्यात आले.



## पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा परिसरात अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर ४ गुन्हे नोंद ०१ लाख ३५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २६/०७/२०२६ रोजी श्री. सागर खर्डे, उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या नेतृत्वात जिल्हागस्त दरम्यान कळमेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा परिसरात उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, सावनेर, कळमेश्वर पोलीस आणि दंगानियत्रंण पथकासह विशेष मोहीम राबवून अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली आहे.

या मोहिमेदरम्यान मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथे अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध सलग छापे टाकून कारवाई करण्यात आली. या कारवाईत ०४ आरोपी यांच्यासह संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत एकूण ४ गुन्हे नोंदविण्यात आले. सदर कारवाईत पोलिसांनी ३६०० लिटर मोहफूल सडवा तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण १,३५,०००/—रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

## अवैधरित्या विनापरवाना देशी—विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८६ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त, पारशिवनी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक २७/०७/२०२६ रोजी पारशिवनी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने एक इसम अवैधरीत्या देशी व विदेशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ पालोरा चौक येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान मोटरसायकल क्र. एम एच—४०/सी यु—१३०५ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू व विदेशी दारूच्या निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे मोहन शामराव**

**बिहुने, वय ३७ वर्ष, रा. मेहंदी, ता. पारशिवनी, जि. नागपुर हा अवैधरीत्या देशी व विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या ४५ निपा किंमती ४५००/—रूपये २) विदेशी दारूच्या १० निपा किंमती २०००/—रूपये मोटरसायकल क्र. एम एच—४०/सी यु—१३०५ किंमती ८०,०००/—रू असा एकुण किंमती ८६,५००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी मोहन शामराव बिहुने, वय ३७ वर्ष, रा. मेहंदी, ता. पारशिवनी, जि. नागपुर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद; १० म्हशी जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २७/०७/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा मारोडी शिवार येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच ४९ सी डब्लु — १९११ येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १० म्हशी जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच ४९/ सी डब्लु — १९११ किंमती ६,००,०००/— रूपये आणि १० म्हशी किंमती १,००,०००/— रूपये असा एकुण किंमती ७,००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

**नमुद प्रकरणी वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द कलम ११(१) डी, ११(१)ई, ११(१) एफ,प्राण्यांचा छळ अधिनियमन्वये गुन्हा नोंद केला आहे**



## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १८ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २७/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात विशेष मोहीम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १८ आरोपीतांवर आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत आरोपी १) सुजल रविंद्र कोकाटे, वय २३ वर्ष, रा. परसोडी दिक्षीत, ता. नरखेड २) सागर राजकुमार लैसिंह, वय ३० वर्ष, रा. परसोडी दिक्षीत ता. नरखेड ३) सुरज अभिमन्यु लैसिंह वय २६ वर्ष, रा. परसोडी दिक्षीत ता. नरखेड ४) दशरथ दुलीचंद ठाकुर, वय ४२ वर्ष, रा. परसोडी दिक्षीत ता. नरखेड यांच्यावर प्रत्येकी

१ गुन्हा दाखल आहे. **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी नामे १) धनराज दौलतराव चरडे, वय ५५ वर्ष, रा. मोहन टॉकीज चंडीका मंदीर काटोल आरोपी २) रमेश रामलाल बेले, वय ६६ वर्ष, रा. सगमानगर काटोल ३) अर्जुन विलास सनेश्वर, वय २५ वर्ष, रा. अण्णा भाउ साठे नगर, काटोल यांच्यावर प्रत्येकी १ गुन्हा दाखल आहे . **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत आरोपी नामे टॉमन उर्फ महेंद्र नामदेवजी बिरणवार, वय ३० वर्ष, रा.नगरधन वार्ड क्र. ०६, ता.रामटेक याच्यावर १ गुन्हा दाखल आहे. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी नामे १) शहबाज मोहम्मद मोहम्मद जमिल, वय ३० वर्ष, रा. सैलाब नगर, कामठी प्रभाग क्र. १६, जिल्हा नागपुर २) शेख फिरोज शेख हनिफ, वय ४३ वर्ष, रा. सैलाब नगर, कामठी प्रभाग क्र. १६, जिल्हा नागपुर यांच्यावर प्रत्येकी १ गुन्हा दाखल आहे.**पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत आरोपी १) शुभम पुरूषोत्म चनेलिया, वय २६ वर्ष, रा. क्वार्टर नं २६/४ लाल कॉलनी, डब्लु सी एल वाघोडा सावनेर २) वुषभ उमेश आटणकर, वय २१ वर्ष, रा. वाघोडा रोड, न्यु गुजरखेडी ता सावनेर ३) रोहीत पुरूषोत्तम चनेलिया, वय ३४ वर्ष, रा. बजात कॉलोनी वाघोडा सावनेर ४) शुभम देरड धुर्वे, वय २९ वर्ष, रा. मौजा डब्लु सि एल वाघेडा ५) जित सोहन आठनकर, वय २० वर्ष, रा. नवीन गुजरखेडी, सावनेर यांच्यावर प्रत्येकी १ गुन्हा दाखल आहे.**पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी १) हरिश रामकिसन फुंडे, वय २१ वर्ष, रा. वार्ड नं. ३, रुईखैरी ता. जि. नागपुर २) दुर्गेश बंडु लोखंडे वय २४ वर्ष रा. वार्ड नं. ३, रुईखेरी ता. जि. नागपुर आणि आरोपी क्र ३) पंकज राधारमण शुक्ला, वय ३६ वर्ष, रा. हनुमान मंदिर जवळ, डोंगरगाव तालुका हिंगणा, जिल्हा नागपुर यांच्यावर प्रत्येकी १ गुन्हा दाखल आहे. नमुद आरोपी हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सार्वजनिक ठिकाणी सेवन करतांना मिळुन आल्याने त्यांचेवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये दाखल करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १५ गुन्हे नोंद

दिनांक २७/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू,

मोहाफुल सडवा, देशी दारू, विदेशी दारू, इतर साहित्य, वाहन असा एकुण २,२६,९२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी नामेचैतु रामाजी उईके, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, वाठोडा मोहपा, ता. कळमेश्वरयांचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी विनोंद महादेव बांगडे, वय ४२ वर्ष, रा. नागलवाडी, ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद,**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी १) पंडीत गणपत बमनोटे, वय ७० वर्ष, रा. वार्ड नं. ०१, केळवद २) मूकेश सियाराम निर्मलकर, वय ३२ वर्ष, रा. टेभंरी, ता. नावागड, जि. बिमेत्रा राज्य छत्तीसगड, ह. मू. बिडगाव, ता. सावनेर ३) माणीकराव दर्याजी भल्लावी, वय ७० वर्ष, रा. बिडगाव, ता. सावनेर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद,**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे०४ गुन्हेनोंद, **पोलीस स्टेशन कुही येथे** आरोपीप्रशिक रमेश नवनागे,वय २६ वर्ष,रा.कुंभारपुरा इतवारी पेठ उमरेड,ता. उमरेड ह.मु.फ्लॅट नं.२०३, बी विंग टेक ऑफ गार्डन बहादुरा फाटा नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव येथे** आरोपीयशवंत क्रिष्णाजी टेकाम, वय ३२ वर्ष, रा. मामा धाबा विहीरगाव नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी येथे** आरोपी मोहन शामराव बिहुने, वय ३७ वर्ष, रा. मेहंदी, ता. पारशिवनी, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल येथे** आरोपी १) विजय प्रभाकर पाटील, वय ३९ वर्ष, रा. ईसापुर बू काटोल, जि.नागपुर २) सुर्यभान गुलाबराव बोंडे, वय ७० वर्ष, रा. सोनखांब काटोल, जि.नागपुर यांचेवरप्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी येथे** आरोपीरवी कृष्णाजी खंडाते, वय ४६ वर्ष, रा. आडेगांव, ता. हिंगणा, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १४०४० मिली देशी दारू, १८०० मिली विदेशी दारू, २३ लिटर मोहाफुल दारू, ३६०० लिटर मोहाफुलरसायन सडवा, वाहन व इतर साहित्य असा एकुण २,२६,९२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६९२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हायांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २८/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनलाशरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६९२आरोपीतांचीआरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९३रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४१आरोपी , पोलीस स्टेशन कुहीयेथे २६आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपीपोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १२९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—**सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४८आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे३०आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १०आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १२०रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३०आरोपी , पोलीस स्टेशन मौदायेथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदायेथे १८ आरोपी अशा एकुण ६८रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३६आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २२आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २१आरोपी अशा एकुण १०६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—**काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५८आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळीयेथे २९आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५३ आरोपी आणि

पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३६आरोपी अशा एकुण १७६रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.








महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन
पारशिवनी
फोन नं. : ०७१०२-२२५१२३




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने